श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.


वर्ष १ लें ]　　चैत्र शके १८४५　　[ अंक १ ला


नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

# विषयानुक्रम


| विषय | पृष्ठांक. |
|---|---|
| मंगलाचरण ... ... ... ... ... | १ |
| मासिकाचा उद्देश ... ... ... ... | २ |
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ४ |
| Scheme for the management of the Shirdi Sansthan ... ... ... | ५ ते ८ |
| आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला. ... ... | ९ |
| श्रीसाईसच्चरित उपोद्‌घातासह ... ... ... ... | १ ते ३२ |


# श्री साईनाथ.

“ श्रद्धावांल्लभते ज्ञानं ”

सा. न. वि. वि. सर्व भाविक व श्रद्धाळू गृहस्थांकडे “ श्रीसाईलीला ” या मासिकाचा प्रथम अंक नमुन्यादाखल पाठविण्याचें ठरल्याप्रमाणें, हा अंक आपल्याकडे पाठविला आहे; व आपण या मासिकाचे वर्गणीदार व्हावें अशी सविनय प्रार्थना आहे.

आपणाकडून एक वर्षाची वर्गणी आगाऊ वसूल करण्यासाठीं पुढील अंक रु. ३. ६. ( ट. ह. सह ) व्ही. पी. नें रवाना करण्यांत येईल. परंतु वर्गणीदार होण्याची आपली इच्छा नसल्यास तसें कळविण्याची मेहेरबानी करावी म्हणजे पुढील अंक आपल्याकडे पाठविण्यांत येणार नाहीं, कळावें.

पत्ता—
श्री साईलीला ऑफीस
५, टरनर रोड बांद्रे ( ठाणें )
चैत्र शु. १ शके १८४५

आपला—संपादक,

श्री साईलीला.

# श्रीसाई लीला.

( मासिक )

वर्ष १ लें. चैत्र शके १८४५. अंक १ ला.

## मंगलाचरण

पद.

साईरहम नजर करना ॥ बच्चोंका पालन करना ॥ साई ॥
जाना तुमने जगत् पसारा ॥ सबही झूट जमाना ॥ १ ॥ साई ॥
मै अंधा हूं बंदा आपका ॥ मुझसे प्रभू दिखलाना ॥ २ ॥ साई ॥
दास गनू कहे अबक्या बोलूं ॥ थक गई मेरी रसना ॥ ३ ॥ साई ॥

पद.

रहम नजर करो अब मेरे साई ॥
तुम बिन नहीं मुझे मा बापभाई ॥ रहम ॥
खाली जमाना मैंने गमाया ।
साथी आखरका । किया न कोई ॥ रहम ॥ १ ॥
मैं अंधाहूं बंदा तुमारा ।
मैना जानूं ॥ अल्लाइलाही ॥ रहम ॥ २ ॥
अपने मसीदका झाडू गनू है ।
मालिक हमारा । तुम बाबा साई ॥ रहम ॥ ३ ॥

# मासिकाचा उद्देश.

या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नांवावरून व्यक्त होत आहे. शिर्डीचे श्रीसाई महाराजांचे भक्त असंख्य असून ठिकठिकाणीं पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी दिले आहेत. इतकेंच नव्हे तर महाराजांनीं आपल्या देहावसनानंतर सुद्धां अनुभव देण्याचें चालू ठेविलें आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचें प्रत्यक्ष दर्शन घडलें नाहीं, त्यांना सुद्धां अनुभव येत आहेत. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रुत पूर्व अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकांतील खालील श्लोकाची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत.

" अनेकाश्रुतातर्क्यलीलाविलासैः ॥
समाविष्कृतेशा न भास्वत् प्रभावं ॥
अहं भावहीनं प्रसन्नात्मभावं ॥
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथं " ॥ १ ॥

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणीं संग्रह होणें शक्य नाहीं, पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोधवचनांचा संग्रह करावा या हेतूनें मासिक पुस्तक काढलें आहे. भावार्थ रामायणांत, श्रीरामचंद्राला पार्वतीनें " तूं सर्वज्ञ असतांना भ्रांतपणाचें अवलंबन करून तृणपाषाणांना आलिंगन कां देतोस " असा प्रश्न केला असतां श्रीरामचंद्रानीं जे शद्ब उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले.

" भक्त उद्धारावया कारणें । रडणें पडणें अडखळणें ।
पर्वतो पर्वतीं धांवणें । आणि आलिंगणें वृक्षांसीं ॥
उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥ "

हे शद्ब सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकूण एक शद्ब व एकूण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठीं होती व त्यांचें एक पाऊल सुद्धां व्यर्थ पडत नव्हतें तर त्या लीलांचा व शद्बांचा संग्रह भक्तांनाच नव्हें तर सर्व जनतेला हितकारी होईल असा आमची खात्री आहे

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झाला आहे व तो या मासिकांत " महाराजांचें अनुभव " व " श्री साईसच्चरित " या मथळ्याखालीं येईल. यापैकीं " श्री साईसच्चरित" पद्यात्मक म्हणजे ओवीबद्ध रचलें गेलें आहे व त्याची म्हणजे श्री साईसच्चरिताची सुरवात महाराज देहधारी असतांना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. 'महाराजांचें अनुभव' या मथाळ्याखालीं निरनिराळ्या भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचें योजिलें आहे. असे परेचसे अनुभव आमच्या संग्रहास आज आहत, त या मथाळ्याखालीं छापले जातील; त्यांत कांहीं चुका असल्यास त्या त्या भक्तांकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदानें प्रसिद्ध करूं. तसेंच महाराजांचे भक्तांकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणें शक्य तितलें स्थळ या मासिकांत देऊं. भक्तांचे अनुभव छापण्यासाठींच हें मासिक असल्यामुळें जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिलें जाईल हें सांगणें नकोच.

समर्थांनीं कोणांस कांहीं गुप्त रितीनें सांगितलें असेल तर तें या ग्रंथांत परिस्फुट होण्याचा संभवच नाहीं, पण त्यांनीं उघडे दरबारांत सर्वांसमक्ष कोणा एकास उद्देशून जरी कांहीं सांगितलें असलें, तरी तें सर्वांच्या हिताचें असल्यामुळें तें सर्वांची सामाईक कमाई आहे असें सर्व सांईभक्त समजत असले पाहिजेत. अशी समजूत आहे आणि म्हणूनच त्यांनीं आपले अनुभव लिहून पाठवाव अशी आमची प्रत्येक भक्तास आग्रहाची विनंती आहे.

शिर्डी श्रीसाईबाबाचे भक्त असंख्य आहेत पण आजमितीला आमचे यादीवर श्रीसमर्थांचे सुमारें ९०० भक्तांची नोंद आहे. आम्हांस हा वेळपर्यंत अज्ञात असे आणखीं किती तरी साई भक्त सर्व हिंदुस्थानभर जागजागीं पसरलेले आहेत. त्यांची माहिती आम्हांस जसजसी मिळत जाईल तसतसी त्यांचींही नांवें या यादीवर चढविण्याचा क्रम सुरू राहील. महाराजांच्या भक्तांनीं आपलीं नांवें व पत्ते आम्हांस लिहून कळविल्यास आमच्यावर त्यांचे उपकार होतील.

सारांश, ही सरस्वतीची सेवा आणि ती परम दयाळू श्री साईमाऊलीचे इच्छेनें आणि आशिर्वादानें घडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळीं आठवण होत रहावी हेंच या सेवेचें ध्येय आहे.

# महाराजांचे अनुभव.

श्री साईभक्ति परायण कृष्णाजी काशिनाथ जोशी उर्फ भाऊ महाराज यांजकडून:—

॥ श्रीगुरू साईनाथ प्रसन्न ॥

( स्वानुभव )

[ श्री साईनाथ लीला ]

( नमन मालाष्टक )

॥ प्रथम नमन माझें, सद्गुरू साईनाथा ॥
॥ हरनि दुरित माझें, मागतों हेंचि आतां ॥
॥ अशिव कलि मला तो, गांजितो नित्य नाथा ॥
॥ तुजविण नच त्राता, दीन या कृष्ण नाथा ॥ १ ॥

॥ गळा रुंड माळा, करीं वाम झोळी ॥
॥ मला वाटतें कीं, असे चंद्र मौळी ॥
॥ नका अंत पाहूं, तुम्ही साइनाथा ॥
॥ दावी मुमूक्षु पथ हा, मज कृष्ण नाथा ॥ २ ॥

॥ हें चालिलें वय वृथा, भुललों प्रपंचीं ॥
॥ तोंही करोनि स्थिरता न घडे मनाची ॥
॥ दुःखार्णवांत बुडतों, मज तारि आतां ॥
॥ नमस्कार माझा, सद्गुरु साइनाथा ॥ ३ ॥

पुढें चालू.

# SCHEME FOR THE MANAGEMENT OF THE SHIRDI SANSTHAN OF SHRI SAI BABA.

1. All the Sansthan property both moveable and immoveable shall vest in the following five trustees for life :-

1. Mr. Moreshwer Vishvanath Pradhan, B. A. LL. B., Member Bombay Legislative Council.
2. Mr. Lakshman Ganesh Mahajani of Messrs. Shoorji Vallabhdas and Co., Merchants Bombay,
3. Prof. Ganesh Govind Narke. Professor of Chemistry and Geology, College of Science, Poona;
4. Ramchandra Atmaram Turkhud, Manager and Secretary, Khatau Makanji Mills, Bombay.
5. Mr. Tatya Ganapati Patil Kote, Land-holder, of Shirdi.

Any vacancy in the trustees shall be filled up by the rest of them as early as possible from among the Bhaktas of Shri Sai Baba subject to confirmation by the District Judge.

2. The management of the Sansthan and its Property both moveable and immoveable shall vest in a Committee called The Shirdi Sansthan Committee, of which the trustees shall be ex-officio members.

3. The Shirdi Sansthan Committee shall consist of 15 members in all, including the trustees and a Chairman, a Treasurer, a Secretary, a Joint Treasurer and a Joint Secretary

Their names are as follows:—

COMMITTEE.

5. Trustees as in rule 1 above.

CHAIRMAN.

6. Ganesh Dattatraya Sahasrabuche alias Das Ganu Religious Preceptor and Hardas.

TREASURER.

7. Mr. Govind Raghunath Dabholkar. Retired Mamladar and Resident Magistrate (First Class) Bandra.

JOINT TREASURER.

8. Mr. Yeshwant Janardan Galwankar, B. A., Judicial Department, Secretariat, Bombay

SECRETARY.

9. Mr. Hari Sitaram Dikshit, Retired Solicitor and Vakil High Court.

JOINT SECRETARY.

10. Ramchandra Dada Kote Patil, Land holder of Shirdi.

MEMBERS.

11. Mr. Krishnarao Narayan Parulkar Honorary Magistrate, Harda, C. P.

12. Mr. Ganesh Damodar Kelkar, Retired Government servant now residing at Shirdi.

13. Mr. Amaidas B. Mehta, Proprietor, British Photo Enlarging Company, Kalbadevi, Bombay.

14. Mr. Madhavrao Balwant Deshpande, landholder, Shirdi. and

15. Mr. Raghuvir Bhaskar Purandare, clerk, Loco Department G. I P. Ry. Bombay.

4. The above persons ( except the trustees who shall hold office for life ) shall hold office for a period of three years after which all the office holders except trustees shall be elected by the Bhakta Mandal which shall be constituted with all convenient despatch in manner hereinafter mentioned

5. The Bhakta Mandal shall consist of such devotees of Shri Sai Baba's Shrine as apply to be enrolled as members of the Bhakta Mandal and agree to contribute to the expenses of the Sansthan a sum not less than Rs 5., per year. The Shirdi Sansthan Committee however shall have power for special reasons to be recorded in wrting to enlist any devotee of the said shrine as an honorary member of the Bhakta Mandal without requiring him to pay the aforesaid annual contribution or to make an application as aforesaid.

6. The quorum for meetings of the Bhakta Mandal shall be ten members and for that of the Shirdi Sansthan Committee shall be five members.

7. Casual vacancies arising in the Shirdi Sansthan Committee ( hereinafter for brevity's sake called the Committee ) by death, resignation or otherwise shall be filled up by the Committee.

8. It shall be the duty of the Committee to arrange,

( a ) for the management of the Sansthan in accordance with the existing practice but subject to such directions as may from time to time be given by the Bhakta Mandal ( hereinafter for brevity's sake called 'Mandal' ).

( b ) for the custody of all cash, documents, papers and other property moveable and immoveable of the Sansthan and for the collection of donations, subscriptions, grants etc., to the Sansthan and for the recovery of the outstandings, rents, profits or other income of the Sansthan and for the payment of all dues, salaries, debts and other reasonable expenses connected with the Sansthan.

( c ) for the keeping of true and proper accounts of all things and moneys received and disbursed for or on account of the Sansthan and for the auditing of the same as also for the preparation of the annual balance sheet of the Sansthan and submitting such balance sheet to the Mandal at its annual meeting and a copy of such balance sheet to the District Court of Ahmednagar.

( d ) For the holding of the fairs and festivals connected with the Sansthan and for the due entertainment of Puraniks, Kathekaris and Bhajankaris, Singers and mendicants visiting the shrine.

( e ) for the investment of the surplus funds of the Sansthan or land or such other securities as are mentioned in section 20 of the Indian Trust Act.

( f ) for the maintenance in a state of repair of the moveable and immoveable property of the Sansthan.

9. The Committee shall not have power to alienate, mortgage or charge any immoveable property or jewellery of the Sansthan without the sanction of the District Court of Ahmednagar. It shall however have power to dispose of any other moveable property of the Sansthan or to destroy such articles as may have become useless and unsaleable. It shall have also power to let any immoveable property of the Sansthan at such rental and on such terms as the Committee may think fit but not for a period exceeding three years.

10. The Committee shall as soon as practicable draw up rules not inconsistent with the provisions of this scheme for the following purposes.

( a ) formation of the Bhakta Mandal.

( b ) holding meetings of the Bhakta Mandal and of the Committee.

( c ) for the internal working of the Committee and for the appointment of a local Sub-committee.

( d ) generally for the management of the affairs of the Sansthan.

11. The Committee shall have liberty to apply to the District Court for directions whenever it may become necessary or advisable to do so.

# आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला

महाराजांच्या लीलांचें कांहीं वर्णन श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर यानी प्रसिद्ध केलेल्या **भजनमालेच्या** प्रस्तावनेत आलें आहे. त्या भजनमालेंतील पद्यें महराजाचे प्रेरणेनें व प्रसादानें कांहीं सावित्रीबाईंनी लिहिलीं आहेत व कांहीं त्यांचे पती रा. रा. रघुनाथराव तेंडुलकर यानी लिहिलीं आहेत. त्या प्रस्तावनत वर्णिलेल्या लीला येथें जशाचा तशाच उतरून घेत आहें. त्या येणेंप्रमाणें:-

महाराज पहिल्यानदा नित्य गांवांतील वाण्याकडून तेल मागून आणीत, आणि तें पणत्यांत घालून काकडे पेटवून मशिदींत रात्रभर जाळीत असत. वाणी शेवटीं कंटाळले, आणि एक दिवस महाराज तेल मागावयास गेले असता तेल नाहीं असें म्हणाले.

महाराज तसेच मशिदींत परतले. तेलाच्या टमरेलांत सांजवात लावण्यापुरतेंच तेल राहिलें होतें. त्यांत महाराजांनीं पाणी घातलें व तें तेलमिश्रित पाणी पिऊन नंतर निव्वळ पाणी घेउन तें पणत्यांत ओतलें. त्यांत काकडे घातले आणि आगकाडी ओढून काकड्याला लाविली तोंतें सर्व काकडे पेटले, आणि नुसत्या पाण्याने दिवे रात्रभर जळत राहिले.

[ पुढें चालू. ]

# श्री साईसच्चरित.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुःसाक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरवेनमः ॥ १ ॥
ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञान मूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्वमस्यादि लक्ष्यं ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरूं तं नमामि ॥
श्री गणेशायनमः श्री सरस्वत्यैनमः श्री सद्गुरुभ्योनमः

## उपोद्घात.

श्री साईनाथ महाराज सुमार पन्नास वर्षांपूर्वी शिरडीस प्रथम आले. शिर्डी हा गांव अहमदनगर जिल्ह्यांत कोपरगांव तालुक्यांत आहे. महाराज मूळ कोठील राहणारे व त्यांची मातापितरें कोण याविषयीं खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. एवढें मात्र खचित दिसतें कीं, महाराजांचा मोगलाइशी संबंध बराच असावा. महाराजांचे बोलण्यांत शेलू, जालना, माणवद, पाथरी परभणी, नौरंगाबाद (म्ह० औरंगाबाद), बीड, बेदर या मोगलाईच्या गांवाचा वारंवार उल्लेख येत असे. एकदां एक पाथरीचा गृहस्थ महाराजांचें दर्शनास आला होता. त्याला महाराजांनीं पाथरीची हकीकत विचारून तेथील बहुतेक ठळक ठळक गृहस्थांचीं नावें घेऊन त्यांचेविषयीं चौकशी केली. यावरून महाराजांना पाथरीची

* श्री साईसच्चरित्राचे सर्व हक्क लेखकानें आपल्या स्वाधीन ठेवले आहेत.

संपादक.

विशेष माहिती होती असे मानतां येईल; पण त्यांच जन्म तेथलाच असावा असें खात्रीलायक म्हणतां येत नाहीं.

तसेंच महाराज मुळचे ब्राह्मण होते, कीं ते जन्मत:च मुसलमान होते हेंही निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. किंबहुना त्यांच्या कित्येक भक्तांच्या मानण्याप्रमाणें ते अयोनिज होते कीं काय हेंही सांगतां येत नाहीं. महाराजांना अयोनिज मानणें हें भक्तेतरांच्या दृष्टीला अशक्य वाटेल पण तसें प्रस्तुत लेखकाला वाटत नाहीं. या लेखकाजवळ महाराजांनीं स्वत: एकदां असे उद्गार काढले होते कीं " आतां आपण जाऊं तं आठ वर्षांचे होऊन येऊं. " श्रीकृष्णमूर्ति देवकी मातेजवळ प्रगटली तेव्हां आठ वर्षांचीच होती असें पुराणांतरीं वर्णन आहे.—" आठा वर्षांची मूर्ती ॥ असंभाव्य पडिली दीप्ति ॥ तेजें दशदिशा उजळती ॥ तेथें लपती शशीसूर्य " ( हरिविजय अ. ३ ओ. १२६ ) महाराजांचे पुष्कळ भक्त त्यांना साधकाचे सिद्ध झालेले मानीत नसून प्रत्यक्ष अवतार मानतात. व महाराजांच्या लीला व त्यांची अद्भुत शक्ति पाहून त्यांना श्रीकृष्णाचा अवतार मानणारे पुष्कळ आहेत. महाराज मात्र स्वत: आपल्याकडे तो अधिकार घेत नसत. ते बोलतांना आपल्याला परमेश्वराचा सेवक ' बंदा " म्हणून घेत. आपल्या गुरूचा आशिर्वाद आपल्याला पूर्ण आहे व त्यांचेंच कृपेनें भक्तांचीं संकटें दूर होऊन त्यांचें कल्याण होतें, असें ते म्हणत. भक्तांना आशिर्वाद देतांना प्राय: " अल्ला भला करेगा " हेच शब्द असत. स्वत:कडे कधींही मोठेपणा घेत नसत. ते कधींही " अनलहक्क् " म्हणजे " मींच परमेश्वर " असें म्हणत नसत. पण त्यांचा उच्चार वारंवार " यादे हक्क् " म्हणजे " मी परमेश्वराचो याद म्हणजे स्मरण करतों " हा असे.

महाराज शिर्डीस आले ते एका मुसलमान गृहस्थाकडील वरातीबरोबर आले. त्याचें नांव चांदभाई. तो धूपखेडें नांवाच्या गांवचा पाटील होता. एक दिवस त्याचा घोडा चुकला म्हणून त्याला शोधावयाला तो रानांत चालला होता. तो तेथें एका झाडाखालीं त्याला महाराज बसलेले दिसले. महाराजांना त्यानें पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. महाराजांनीं त्याला हाक मारली व चिलीम पिऊन जा असें म्हटलें. तो म्हणाला माझा घोडा

चुकला आहे व मी त्याच्या शोधासाठीं निघालों आहे. महाराज म्हणाले त्यासाठीं लांब कशाला जावयाला पाहिजे. तो पलिकडच्या कुंपणाच्या आड आहे. त्याबरोबर चांदभाई, महाराजांनीं सांगितलेल्या कुंपणाकडे गेला तों तेथें घोडा खरोखरच चरत होता. चांदभाईनें घोडा घेतला व तो महाराजांकडे आला. महाराजानीं त्याला चिलीम पाजल्यावर तो महाराजांना आपल्या घरीं येण्याबद्दल आग्रह करूं लागला. महाराज म्हणाले मी उद्यां येईन. त्याप्रमाणें महाराज दुसरे दिवशीं त्याचे घरीं गेलें. चांदभाईलां चिलीम पाजली तेथें रानांत विस्तव नव्हता. महाराजांनी आपल्या हातांत असलेला चिमटा जमिनीवर आपटून विस्तव उत्पन्न केला व आपलें काम करून घेतलें.

महाराज चांदभाईचे घरीं कांहीं दिवस राहिले. नंतर चांदभाईचे बायकोच्या भाच्याची सोयरीक शिर्डीच्या एका मुलीशी झाली व त्या लग्नाचे वरातीबरोबर महाराज शिर्डीस आले. वरात गांवाबाहेर खंडोबाचे देवळाजवळ एका मळ्यांत उतरली होती. महाराज खंडोबाचे देवळांत गेले तों तेथें त्यांनां म्हाळसापती या नांवाचे गृहस्थ भेटले. हे म्हाळसापती शिर्डीचे राहाणारे असून जातीनें सोनार होते. हे खंडोबाचे भक्त असून खंडेरायाची वारी त्यांच्याकडे कित्येक पिढ्यांपासून असे. महाराज खंडोबाचे देवळांत गेले तेव्हां कफनी, टोपी व अंगावर धोतर असा पोशाख होता. त्यांना पाहिल्यावरोबर म्हाळसापतीनीं " आवो साईबाबा " या शब्दांनीं त्यांचें स्वागत केलें. व तेंच नांव म्हणजे " साईबाबा " महाराजानीं अखेरपर्यंत धारण केलें. महाराजांची बहुतक भक्तमंडळी त्यांना साईबाबा किंवा बाबा असें म्हणत. महाराजांची एकदां एका कामांत कमीशनवर साक्ष झाली तेव्हां महाराजांना नांव विचारलें असतां "मला साईबाबा म्हणतात " असें उत्तर दिलें. म्हाळसापती महाराजांना गांवात घेऊन आले व तेथें त्यांनीं महाराजांची व आपले सोबती काशिराम शिंपी व आप्पा जागले यांची गांठ घालून दिली. हे तिघेही गांवात येणाऱ्या साधुसंतांची, गोसावी बैराग्याची, फकीर फुकऱ्याची आपल्या शक्तीप्रमाणें सेवा करीत. व त्यांचा परामर्ष घेत. शिर्डी गांव फार रहदारीचा असल्यामुळें येथें वारंवार अशी मंडळी येत व त्यांची थोडी बहुत संभावना, व्रत

लिहिलेल्या त्रयीकडून होत असे. हे तिघेही म्हणजे काशीराम, आप्पा व म्हाळसापती महाराजांचे पूर्ण भक्त बनले. यांपैकीं काशीराम व आप्पा हे पुढें कांहीं वर्षांनी वारले. काशिरामानीं आधीं देह ठेवला व त्यानंतर कांहीं वर्षांनीं अप्पानीं देह ठेवला. पण दोघांनाही मरण समयीं एकादशी लाभली. हरिभक्तांचें मरण हरि दिनींच होणें योग्य व त्या प्रमाणेंच या दोघांचेंही झालें. काशीरामानीं महाराजांची सेवा अति उत्तम तऱ्हेनें म्हणजे खरोखरच तन मन धनानें केली. महाराजांची कफनी पूर्वी भगवी किंवा पांढरी असे. पण काशीरामानें हिरवी कफनी व हिरवी टोपी महाराजांना शिवून दिली; पण प्राय: महाराज पांढरीच कफनी घालीत व डोक्यास धोतर बांधीत. तसेंच महाराजांना चिलीम तंबाकू पुरवून त्यांच्या धुणीला सर्पणही पुरवावयाचें व जरूर पडल्यास पैसेही द्यावयाचे, हें व्रत काशीरामानीं चालविलें. पुढें पुढें तर आपली पैशाची थैलीच महाराजांपुढें ठेवावयाची व महाराजांनीं इच्छेस येईल तितके पैसे घ्यावे अशी विनंती करावयाची. महाराज त्यावेळेस दक्षणा घेत नसत, तरी पण काशिरामाकडून पैसा दोन पैसे नेहमी घेत. महाराजांनीं आपल्याकडून दक्षणा घ्यावी याबद्दल काशीरामाला इतकी आतुरता असे कीं, एकादे दिवशी जर महाराजांनीं दक्षणा घेतली नाहीं तर त्याला अतिशय वाईट वाटून डोळयांतून अश्रूही यावयाचे. अशाप्रकारें वाईट वाटणें सुद्धां परमार्थाला विघातक आहे. कारण त्यांत माझी देण्याची शक्ति आहे अशा तऱ्हेचा अभिमान शिरतो. अर्थात् भक्तांच्या परमार्थाला विघातक गोष्टी असतील त्या काढून टाकण्याचा देवाचा नित्य-संकल्प असतो. त्या प्रमाणें काशिरामासही झालें. कांहीं दिवसांनीं त्याची पैशासंबंधानें ओढाताण होऊं लागली, आणि महाराजांनीं त्याच्या जवळ दक्षणा मागण्याचा सपाटा चालविला. पैसे संपले असे त्याला मोठ्या कष्टानें म्हणावें लागलें. मग वाण्याजवळून मागून मला आणून दे असें महाराजांनी म्हटलें. त्याप्रमाणें कांहीं दिवस वाण्याकडून मागून आणण्याचा क्रम चालू ठेवला. पुढें वाण्याही पैसे देईनासा झाला. अर्थात् सगळी लीला काशिरामाचा अभिमान दूर करण्यासाठींच होती. त्याची अशी खात्री झाली कीं, आपली देण्याची शक्ती नाहीं, व हें त्याला पटल्या-

बरोबर त्याची सांपत्तिक स्थिति सुधरत चालली व तो पूर्वीप्रमाणें सुखवस्तु झाला. महाराजांनीं आपल्याकडून दक्षणा नित्य घ्यावी ही तळमळ पार नाहींशी झाली.

काशिराम कापड विकण्याचा धंदा करीत असे व निरनिराळ्या गांवीं बाजारचे दिवशीं दुकान घाली.

एकदां नाऊरच्या बाजाराहून परत येतांना कांहीं लुटारू भिल्लांशीं त्याची गांठ पडली. काशिराम घोडयावर होता तिकडे लुटारू प्रथम गेले नाहीत. पण त्याच्या बरोबरच्या गाडया रस्त्यानें चालल्या होत्या त्या त्यांनीं अडविल्या. नंतर काशिरामाकडे त्यांचें लक्ष गेल्याबरोबर ते तिकडे धावून गेले. चोरांनीं काशिरामाला लुटण्याची तयारी केली व त्याप्रमाणें कांहीं सामान घेतलेंही व त्याला काशिरामानें हरकत केली नाहीं. पुढें त्या चोरांनीं त्याचेजवळ एक लहानशी गाठोडी होती तिला हात घातला. चोरांना वाटलें त्यांतच कांहीं डबोलें आहे. खरोखरच त्यांत नुसती पीठी साखर होती. काशिरामाला जानकीदासबाबा या नांवाच्या सत्पुरुषानें मुंग्यांना साखर घालीत जावी असा उपदेश केल्यापासून काशिराम नेहमीं साखर जवळ बाळगीत असे, अर्थात ती गठडी त्याला अत्यंत प्रीय होती, व काय वाटेल तें होवो पण ती गठडी जाऊं द्यावयाची नाहीं, असा त्यानें निश्चय केला. तितक्यांत त्या चोरांपैकीं एकाची तरवार पडली होती तिकडे काशिरामाचें लक्ष जाऊन त्यानें ती उचलली. व त्या चोरांपैकीं दोघांना त्यानें ठार केलें. इतक्यांत तिसऱ्या चोरानें मागाहून येऊन कुऱ्हाडीचा घाव त्याचे डोक्यावर घातला त्याबरोबर काशिराम बेशुद्ध होऊन प्रेतवत् पडला. राहिलेल्या चोरांना काशिरामाचा प्राणांत झाला असें वाटून ते त्याला तेथेंच टाकून चालते झाले. पण वस्तुतः त्याचा प्राणांत झाला नव्हता. पुढें कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला व कांहीं दिवसांनीं बरा झाला त्याची महाराजांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे त्यानें इस्पितळांत जाण्याचे नाकारलें व मला शिर्डीस घेऊन चला असा आग्रह धरला. त्याप्रमाणें त्याला. तेथें आणलें आणि महाराजांच्या सांगण्यावरून तेथेंच माधवराव देशपांडयांकडून औषधोपचार करविला. अर्थात महाराजांचे कृपेनें काशिरामाची प्रकृती चांगली झाली.

या शूर कृत्याबद्दल मुंबई सरकाराकडून काशीरामास एक तरवार बक्षीस मिळाली. काशिरामाची चोरांशी झटापट चालली असतांना इकडे शिरडीस महाराजांनी आकांत करून सोडला. एकसारख्या शिव्या, बोंबा मारणें व इतर क्षोभाचे प्रकार चालले. जवळ असलेल्या मंडळींनी ताबडतोब ओळखिलें कीं, कोणत्या तरी प्रिय भक्तावर अति महत्संकट आलें आहे. व हा सगळा आकांत त्या संकटांतून भक्ताला रक्षण करण्यासाठींच आहे आणि तसाच प्रकार झाला. चोर पुष्कळ असून हत्यारबंद होते. त्यांचे तडाक्यांतून काशिरामानें जिवंत सुटणें कोणालाही शक्य वाटलें नसतें, पण तारणाऱ्यापुढें मारणाराचें काय चालतें ? असो काशिराम यानंतर कांही वर्षें वांचला व शके १८२० च्या चैत्र शुद्ध ११ ला वारला.

वर लिहिलेल्या तिघांपैकीं म्हाळसापति बरेच दिवस हयात होते व नुकतेच म्हणजे गेल्या भाद्रपदांत वारले. त्यांचा व महाराजांचा अति निकट संबंध होता. महाराजांचें वसणें मशिदींत असे व निजणें एक रात्र मशिदींत व एक रात्र चावडींत असे. महाराज मशिदींत निजत त्या रात्रीं महाळसापति उजाडेपर्यंत महाराजांजवळ बसून असत, व मधून मधून दोघांच्या अति प्रेमाच्या गोष्टी चालत. म्हाळसापतींचें देहावसान होईपर्यंत त्यांचा एक दिवस आड मशिदींत रात्रभर बसण्याचा क्रम चालू असे. हे चांगले अधिकारी असून पूर्ण निरपेक्ष असत व यांचे पासून महाराजांचे भक्तांना बोध व आनंद नित्य मिळत असे किंबहुना महाराजांच्या पश्चात् त्यांच्या भक्तांना हें एक विश्रांतिस्थानच होतें.

महाराज येथें आल्यापासून प्राय: येथील मशिदींत वास करूं लागले. ती मशीद त्या वेळेला अगदीं पडक्या स्थितींत असे. महाराज दिवसा इकडे तिकडे जात पण रात्रीं मशिदींतच राहत. कोणी जेवायाला नेलें तर जात;लोकांस औषध पाणी सांगत व देत, पण त्यासाठीं कधींही पैसा घेत नसत, इतकेंच नव्हे पण रोग्यांची शुश्रुषा योग्य होत नसली तर स्वत: आपण जाऊन करीत व अशा तऱ्हेनें महाराजांनी ज्यांना औषधोपचार केला व ज्यांची शुश्रुषा केली अशी पुष्कळ मंडळी असून येथें आहेत. पुढें औषध पाणी देण्याचें महाराजांनीं बंद केलें व नुसती

उदी म्हणजे अंगारा देऊं लागले. पूर्वीही अंगारा देत असत व त्यापासून लोकांना गुण येई.

आपण पूर्वी लोकांना औषध पाणी करीत होतों अशाविषयी उल्लेख महाराजांनी एकदा प्रस्तुत लेखकाजवळ केला होता. ते म्हणाले "काका ( प्रस्तुत लेखकाला ते काका म्हणून हाक मारीत. ) मी पूर्वी लोकांना औषध देत असें. पुढें औषध देणें सोडलें आणि हरि हरि करूं लागलों आणि हरि हरि करतां करतां हरि भेटला."

महाराज येथें प्रथम आले तेव्हां येथें एक देवादास नांवाचे साधु असत व त्यांचेकडे निरनिराळे साधु निरनिराळे वेळीं येत. तसेच रामेश्वर, पंढरपूर, व इतर दक्षिणेकडील क्षेत्रांना पाय वाटेने जाणारे यात्रेकरूंचा हा रस्ताच असल्यामुळें पुष्कळ सत्पुरुषांचे पाय येथें वेळो-वळीं लागत. त्यापैकीं एक जानकीदास नांवाचे साधु येथें बरेच दिवस होते, ते उत्तम अधिकारी होते असें सांगतात. त्यांची व महाराजांची फार बैठक असे. तसेच सुप्रसिद्ध गंगागीर बाबाही येथें येत असत. महाराज येथें आल्यानंतर जेव्हां गंगागीर येथें प्रथम आले तेव्हां महाराज दोन हातांत दोन मातीच्या घागरी विहीरीवरून भरून नेत होते. त्यांना पाहिल्याबरोबर गंगागीर बाबा जवळ असलेल्या गांवकरी मंडळींना म्हणाले " ही मूर्ति येथें कधी आली. हें केवळ रत्न आहे. यांची योग्यता फारच मोठी आहे. गांवचें फार मोठें भाग्य की, हे रत्न तुह्मांला लाभलें." नंतर गंगागीर बाबा महाराजांचे दर्शनास गेले व दोघांच्या मोठ्या प्रेमाच्या गोष्टी झाल्या. असेच उद्गार महाराजांसंबंधाने अक्कल-कोटच्या आनंदनाथमहाराजांनी काढले होते. हे आनंदनाथमहाराज अक्कलकोटच्या सुप्रसिद्ध स्वामींचे शिष्य होते. ते येवल्याजवळ सावरगांव येथें एकदां गेले असतां शिर्डीचे माधवराव बळवंत देशपांडे, दगडू भाऊ गायके, नंदराम शिवराम मारवाडी व भागचंद मारवाडी, त्यांचे दर्शनास गेले होते. दर्शन झाल्यावर ही मंडळी शिर्डीस यावयाला निघाली तो आनंदनाथमहाराज एकाएकीं धांवत येऊन त्यांचे गाडींत बसले, व म्हणाले मी तुमच्याबरोबर येतों. नेवरगांवाच्या व येवल्याच्या मंडळींनी महाराजांना

अडविण्याचा प्रयत्न केला पण तो व्यर्थ गेला. आनंदनाथमहाराज येथें आले तेव्हां त्यांनीं महाराजासंबंधानें शब्द काढले ते असे " हा हिर आहे. याची खरी किंमत तुम्हांला नाहीं. हा जरी उकरडयावर असला तरी प्रत्यक्ष हिरा आहे हें ध्यानांत ठेवा" यावेळीं महाराज प्रसिद्धीस आले नव्हते व गांवांतले लोक त्यांना एक साधारण किंबहुना वेडा फकीर मानीत.

महाराजांची स्थिति या वेळेला " फाटकें तुटकें नेसतो रे ॥ मन मानेल तेथें बसतो रे। वेडया वेडया परि दिसतो रे। परी ब्रम्हांड गिळुनी असतो रे ॥ " अशी होती. महाराज कधी ओढयावर जाऊन बसत, कधी गांवकुसाजवळ असलेल्या एका लिंबाखालीं बसत, कधीं कोणाच्या मळयांत जाऊन बसत, अंगावरील कपडे फाटके असत, कधीं कधीं उग्र-रूप धारण करीत. या व अशाच वर्तनामुळें साधारण जनसमाजाला ते वेडेच वाटत. पण लौकरच लोकांचा भ्रम दूर झाला व महाराजांची योग्यता शिर्डीच्या लोकांना कळून आली. तो प्रकार असा घडून आला महाराजांना मशिदींत व देवळांतूनही पुष्कळ दिवे लावण्याची हौस असे. अर्थात हौस असे हें व्यावहारिक दृष्टीचें बोलणें आहे. खरोखर पाहिलें तर त्यांचे करणें कोणती हौस पुरविण्याकरितां नसे. ( कारण, त्यांना हौस अशी उरलीच नव्हती ) तर त्यांत कांहीं तरी अन्य हेतु म्हणजे लोकांचें हित करण्याचाच असावयाचा असो. या दिव्यासाठीं महाराज तेली व वाणी यांचे घरोघर जाऊन तेल मागून आणीत. कांहीं दिवस त्यांनीं महाराजांना तेल दिले. अर्थात तीं व्यावहारिक माणसें किती दिवस तेल देणार! त्यांनीं एक दिवस महाराजांना तेल नाहीं म्हणून सांगितलें. त्यामुळें महाराजांच्या नित्य क्रमांत थोडाच फरक पडणार होता महाराजांनीं पणत्यामध्यें तेलाऐवजीं पाणी घातलें आणि नेहमींप्रमाणें काकडे घालून काडी ओढून ते पेटविले. महाराज ही तयारी करीत असतांना लोकांना त्यांच्या वेडेपणाविषयीं खात्री वाटूं लागली, पण जेव्हां काडी ओढून कांकडयास लावल्याबरोबर ते पेटले व रात्रभर जळत राहिले तेव्हां अर्थातच लोक थक्क झाले व त्यांनीं तोंडांत बोटें घातलीं व ते महाराजांना शरण गेले व महाराजांची अवहेलना केल्याबद्दल क्षमा



श्री साईमहाराज यांची समाधि

ठागले कित्येकांनी तर महाराजांना निरनिराळ्या तऱ्हेनी थोडथोडें ही होतें. ते तर फारच घाबरले. पण महाराज पूर्ण दयाळू, अपकार करणाऱ्यांचीसुद्धां उपेक्षा करावयाची नाहीं पण त्यांच्यावरही उपकारच करावयाचा हें महाराजांचें ब्रीद. तेव्हां अर्थातच् कोणालाही भिण्याचें कारण नव्हतें. सर्व लोकांवर महाराजांचें प्रेम असून त्यांचें पुत्रवत् प्रतिपालन महाराज करीत. गांवावर कोणतेही संकट यावयाचें असलें की, महाराजांनीं त्याची अगाऊ सूचना द्यावयाची व महाराजांचे सांगण्याप्रमाणें जे वागत ते निर्भय होत.

सगळ्या गांवची जरी महाराजांवर श्रद्धा बसली तरी महाराजांशीं निकट संबंध फार थोडया लोकांचा असे. महाराजांच्या प्रखर वृत्तीमुळें त्यांच्याशीं फाजील सलगी करण्याची कोणाची हिंमत होत नसे; आणि मशिदींत लोकांचें जाणें येणें फार कमी असे. या वेळेला येथील देशपांडे घराण्यापैकीं माधवराव बळवंत यांचें जाणें येणें विशेष होऊं लागलें. मशिदीच्या आवाराला लागूनच एक लहानसें घर होतें तेथें त्यावेळीं येथील मराठी शाळा असे. त्या शाळेंत माधवराव हे मास्तर झाले होते व त्यांनीं वेळोवेळीं शाळेंतून मशिदींत जाण्याचा पाठ पाडला. तेथें गेले म्हणजे चिलीम भरून आपण ओढावयाची आणि महाराजांना ओढावयाला द्यावयाची. कोणत्या कारणानें कां होइना माधवरावांची महाराजांशी सलगी होऊं लागली आणि माधवरावांचें मन महाराज आकर्षण करूं लागले. कांहीं वर्षांनीं माधवरावांनीं सर्व धंदे सोडून केवळ महाराजांची व त्यांचे दर्शनास येणाऱ्या मंडळीची सेवा हाच एक धंदा पत्करला. या सेवेबद्दल मोबदला म्हणून माधवरावांनीं कधींही मागितला नाहीं. अजूनही यांचा आणि महाराजांच्या भक्तांचा निकट संबंध आहे. आणि त्यांचा पुष्कळ मंडळीना आधार वाटतो; व कित्येक भक्त तर अधिक उणं कांहीं निघाल्यास माधवरावांचे सल्याशिवाय पुढें पाऊल टाकीत नाहींत.

महाराज शिर्डी सोडून बहुतकरून कोठें जात नसत. मात्र कधी कधीं निमगांवास बाबासाहेब डेंगळे या नांवाचे महाराजाचे भक्त असत

तिकडे जात व कधीं राहत्यास चंद्रभानशेट मारवाडी यांचेकडे जात चंद्रभानशेट वारल्यावर त्यांचे दुकानाचा कारभार खुशालचंदशेट पाहत असत. या खुशालचंदजीना महाराज वारंवार बोलवणें धाडीत व कोणी राहत्याचा माणूस आला कीं, त्याला खुशालचंद भेटला होता का म्हणून विचारीत. असो.

बाबासाहेब डेंगळे यांचे बंधु नानासाहेब डेंगळे जाळी निमगांव येथें राहत असत. त्यांना मुलगा नव्हता. प्रथम कुटुंबास मुलगा होईना म्हणून दुसरें केलें, तरीसुद्धां कांहीं उपयोग झालां नाहीं. मग बाबासाहेबांनीं त्याना महाराजांचे दर्शनास पाठविलें. महाराजांचे दर्शनास नानासाहेब डेंगळे आले तेव्हां महाराजांनीं मुलगा होईल असा आशिर्वाद दिला व योग्यवेळीं तो आशिर्वाद फलद्रूप होऊन त्यांना मुलगा झाला. अर्थातच त्यामुळें नानासाहेबांची श्रद्धा महाराजांवर बसली व ते महाराजांकडे वारंवार येऊं लागले. त्यांचे सरकारी कामगारांशीं बरेंच दळणवळण असल्यामुळें त्यांनी साहजिकच महाराजांचे गुण कामगार मंडळीजवळ गाईलें. आणि त्यामुळें लवकरच कलेक्टराचे चिटणीस रा. रा. चिदंबर केशव ऊर्फ अण्णासाहेब गाडगीळ कांहीं मंडळींना घेऊन महाराजांचे दर्शनास आले. अण्णासाहेब गाडगिळांची महाराजांवरील श्रद्धा उत्तरोत्तर वाढत जाऊन ते महाराजांचे पूर्ण भक्त बनले.

महाराज ज्या मशिदींत बसत व निजत ती पूर्ण मोडकळीस आलेली असून खालीं धुरळा अतिशय; व वरूनही माती पडावयाची अशी स्थिति असल्यामुळें नानासाहेब डेंगळ्यांनीं महाराजांना एक जाड फळी निजण्यासाठीं म्हणून आणून दिली. त्यांचा हेतु हा कीं महाराजांनीं नुसत्या जमीनीवर न निजतां ती फळी खालीं टाकून तिच्यांवर निजावें. महाराजांनीं त्या फळीचा उपयोग निजण्यासाठीं केला पण प्रकार निराळा केला. ती फळी जमीनिवर न टाकतां ती मशिदीच्या अढधाला जुन्या चिंध्या बांधून टांगली व तिच्यावर निजूं लागले. त्या चिंध्याकडे पाहिलं तर फळीचें सुद्धां ओझें सहन करण्यासारख्या त्या नव्हत्या पण महाराजांच्या प्रभावामुळें त्या फळीचेंच काय पण महाराजांच्या शरिराचेंई

ओझें त्या सहन करूं लागल्या. निजतांना चार बाजूला चार जळत्या पणत्या महाराज ठेवीत. त्या फळीवर महाराजांना पहाण्याचें त्याला त्याला मोठें कौतुक वाटे. व पुष्कळ मंडळी लांब उभें राहून तें कौतुक पाहत, मात्र महाराजांना फळीवर चढतांना किंवा उतरतांना कोणी पाहिलें नाहीं. पुष्कळदां मंडळींनी पाळती ठेविल्या पण महाराजांचे चढणें ऊतरणें कोणालाही दिसलें नाहीं. वरील कौतुक पहाण्यासाठीं मंडळी फार जमूं लागली तेव्हां ही उपाधी दूर होण्यासाठीं महाराजांनीं ती फळी एके दिवशीं तोडून टाकली.

नानासाहेब डेंगळे ज्या कारणासाठीं महाराजांचे दर्शनास प्रथम आले त्याच कारणासाठीं कोपरगांवचे मुलकी सर्कल इन्स्पेक्टर गोपाळराव गुंड हेही दर्शनास आले. यांना तीन कुटुंबें असून मुलगा नव्हता. यांनाही महाराजांचें आशिर्वादानें मुलगा झाला. हेहीं महाराजांचे पूर्ण भक्त बनले. यांच्या मनांत एकदां असें आलें कीं, मशीद मोडकळीस आली आहे, ती आपण फिरून बांधवावी. व त्यासाठीं त्यांनीं बरेचसे दगड गोळा केले. पण महाराजांनीं त्यांना मशीद बांधण्याची परवानगी दिली नाहीं. तें काम दूसऱ्या एका भक्ताकडून करवून घ्यावयाचें होतें. ती हकीकत पुढें दिली आहे. गोपाळरावांनीं जमविलेल्या दगडांचा विनियोग महाराजांच्याचा आज्ञेनें तेथील शनीचें देऊळ बांधण्यांत व गांवांतील दुसऱ्या देवळांचा जीर्णोद्धार करण्यांत आला. महाराजांचें सर्व देवळांकडे लक्ष असे. तेथील मारुतीच्या देवळाचाही महाराजांनींच जिर्णोद्धार करविला व तें देऊळ मोठेंही करविलें. जसें गांवांतील देवळांकडे महाराजांचें लक्ष असे तसेंच येथील तुरबतीकडे सुद्धां महाराजांचें लक्ष असे. गांवकुसाजवळील निंबाच्या झाडाखालीं महाराज कधीं कधीं बसत म्हणून वर सांगितलें आहे. तेथेंच एक पीराची तुरबत आहे असें महाराजांनीं एकदां म्हटलें व तेथें खणून पाहिलें तों तेथें खरोखरच तुरबत निघाली. मग त्या दिवशीं मंडळीनीं महाराजांची वाजत गाजत मिरवणूक काढली. या तुरबतीबद्दलचा उल्लेख महाराजांनीं प्रस्तुत लेखकाजवळही केला होता. महाराज म्हणाले. ही आपल्या वडीलांचा जागा आहे. येथें दर गुरुवारीं

व शुक्रवारीं उद जाळीत जावा म्हणजे त्यांत आपलेंच कल्याण आहे. एकदां गोपाळराव गुंडाच्या मनांत असें आलें कीं, येथें महाराजांप्रीत्यर्थ वार्षिक जत्रा उर्फ उरूस भरवावा तो विचार त्यानें गांवांतील तात्या पाटील, दादा कोते पाटील, माधवराव देशपांडे वगैरे मंडळींपुढें ठेवला व त्यांना तो रुचला. त्यांनीं त्यासाठीं जमवाजमव करण्याचें मनावर घेतलें. पण तेथें तेव्हां असलेल्या कुळकर्ण्याकडून आडकाठी झाली व तिचा परिणाम हा झाला कीं, कलेक्टरानें जत्रा भरवूं नयें म्हणून हुकुम दिला. पण जत्राभरविण्या संबंधानें महाराजांचा आशिर्वाद पूर्ण होता. म्हणून वरील मंडळींनीं फिरून कलेक्टराकडे अर्ज करून, पहिला हुकुम रद्द करवून जत्रा भरविण्याचा हुकूम आणला. ती जत्रा महाराजांचे आज्ञेनें रामनवमीला भरवावयाचें ठरले व तेव्हांपासून ती सुरू झाली. ती अजूनही दर रामनवमीला भरत असते

या जत्रेची व्यवस्था पहिल्यापसून शिर्डी येथील तात्या गणपत पाटील कोते हे पाहत असतात. त्यांच्यावर महाराजांचें अत्यंत प्रेम असे हे महाराजांना मामा म्हणत. यांची आई सौ. बायजाबाई यांनीं महाराजांची फार सेवा केली. आणि ती अशा वेळेला कीं, जेव्हां गांवांतील बहुजन समाज महाराजांना वेडयांत काढी. महाराज पूर्वी दिवसांतून चार पांच वेळां गांवांत भिक्षेला जात. पण सौ. बायजाबाईनीं त्याला कधींही विन्मुख लाविलें नाहीं. अर्थात या सेवेचें फळ बाईंना तर मिळालेंच पण त्यांच्या सर्व कुटुंबाला व विशेषतः तात्यांना मिळालें. तात्यांना महाराज पैसे देत इतकेंच नव्हे तर त्यांचें सर्व तऱ्हेनें त्राण करीत. संध्याकाळीं रोज तात्या महाराजांकडे जात त्या वेळचा मामा भाच्यांचा प्रेमाचा सोहळा पाहण्यासारखा असे. व प्रेमाचीं भाषणें ऐकण्या सारखीं असत. तसेंच मशिदींतील व चावडींतील सर्व व्यवस्था तात्या कडेच असे. तात्यांनीं येऊन उठविल्याशिवाय महाराज उठत नसत. तात्यांनीं महाराजांना हातींधरून नेऊन तेथें महाराजांसाठीं आसन घालावयाचें व त्यावर महाराजांनीं बसावयाचें असा क्रम असे. चिलीमही तात्यांनीच भरून द्यावयाची.

रामनवमीचें जत्रेचे वेळीं म्हणजे खुद्द रामनवमीचेच दिवशीं दोन मोठया निशाणांची थाटाची मिरवणूक निघून मशिदींत जात असे. व तेथें तीं दोन निशाणें दोन टोकांला बांधली जात. त्यांपैकीं एक निशाण रा. शंकरराव रघुनाथ देशपांडे उर्फ नानासाहेब निमोणकर यांजकडून येत असे. व एक नगरचे दामुशेट कासार यांचेकडून येत असे. नानासाहेब निमोणकर हे निमोणचे देशपांडे होते. निमोण गांव संगमनेर तालुक्यांत आहे. नानासाहेब तालुक्यांत पुढारी गृहस्थांमध्यें मोडत असून सरकारांनीं त्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमिलें होतें. व तें काम त्यांनीं पुष्कळ वर्षे केलें. शेवटीं वृद्धापकाळ झाला म्हणून तें त्यांनीं सोडलें. त्यांचे चुलते येथें रहात असत व ते कधीं कधीं येथें येत. येथें आले म्हणजे चुलत्याचे सांगण्यावरून महाराजांचे दर्शनास जात. हळू हळू महाराजांवर त्यांची श्रद्धा वाढत चालली आणि शेवटलीं तीन वर्षे तर त्यांनीं महाराजांच्या अखंड सेवेंतच घातलीं. फक्त स्नानसंध्यादि नित्य कर्म उरकण्यापुरते घरीं जात. बाकी सारा वेळ महाराजांचे सेवेंत तत्पर असत. साठी उलटून गेली होती, तरी महाराजांची सेवा करिताना आळस किंवा विश्रांतीची इच्छाही कधीं त्यांनां शिवू दिली नाहींत. महाराज त्यांनां काका म्हणून हाक मारीत. महाराजांच्या पश्चात् हे फार दिवस राहिले नाहींत. लौकरच त्यांनां महाराजांनीं आपल्या पायापाशीं नेलें. महाराजांचे कृपेनें त्यांचा अंत उत्तम झाला. शेवटचे तीन दिवस त्यांना जिकडे तिकडे महाराजच दिसत. व जो जवळ येई त्याला साईबाबा ( महाराजांना बाबा म्हणत तें वर सांगितलेंच आहे ) म्हणत. स्वतःच्या कुटुंबालाही "या साईबाबा" असे म्हणत. कुटुंबाला वाटलें त्यांना कांहीं भ्रम झाला असेल आणि म्हणून कुटुंबानीं म्हटलें " मी बाबा नव्हे. मी आपली पत्नी आहे " त्यावर ते म्हणाले " तुझ्यांत कोण. बाबाच आहेत. तूं बाबाच आहेस.' अशा तऱ्हेनें महाराजांचे अखंड स्मरणांत त्यांचा अंत झाला.

रामनवमीचे वेळीं दुसरें निशाण येतें तें दामोदर सावळाराम ऊर्फ दामूशेट कासाराचें हें वर सांगितलेंच आहे.

यांना तीन कुटुंबें असून एकापासूनही पुत्र संतती नव्हती व त्यामुळे तेफार ग्वंती असत, त्यांना एकदां माधवराव देशपांड्याचे सासरे रा.

गोविंदराव सापकर यांनी येथें येऊन महाराजाचा आशिर्वाद घ्यावा असें सुचविलें. त्याप्रमाणें ते आले. महाराजांनीं आशिर्वाद दिला व त्या आशिर्वादाप्रमाणें त्याना मुलगा झाला अर्थात् त्याची निष्टा महाराजावर बसली. व तेव्हांपासून रामनवमीला नवीन निशाण आणावयाचें व त्या दिवशीं येथें फकीर जमले असतील त्यांनां सगळ्यांनां जेऊं घालावयाचें हा नेम त्यांनीं धरला. व तो त्यांचा नेम अजून चालू आहे.

रामनवमीची जत्रा सुरू होण्याचें कांहीं वर्षांपूर्वी महाराजांनी एका निष्काम भक्ताला आपल्याकडे ओढून घेतलें होतें. ते भक्त ह्मणजे रा रा. नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर. हे कल्याणचे रहाणारें असून त्या वेळेला नगरच्या कलेक्टराचें चिटणीस होते. यांनां एकें दिवशीं येथील कुळकर्णी रा. केशव अनंत उर्फ आप्पा यांनीं सांगितले कीं, आपल्याला महाराजांनीं बोलाविलें आहे. नानासाहेबांना हें आप्पाचें बोलणें प्रथम खरें वाटलें नाहीं, व त्यांनीं त्याला ह्मटलें उगीच महाराजांचें नांव कशाला सांगतोस ? तुझें माझ्याशी कांहीं काम असेल तर तसें स्पष्ट सांग. त्यावर आप्पानें खरोखरच महाराजांनीं बोलाविलें आहे असे निश्चयानें सांगितल्यावरून नानासाहेब महाराजांचें दर्शनास आले व लौकरच त्यांची श्रद्धा महाराजांवर बसली. मग ते येथें वारंवार येऊन महाराजांच्या बोधामृताचा लाभ घेऊं लागले. महाराजांच्या व त्यांच्या तासच्यातास बैठकी होत. "तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्व दर्शिन: ॥" या श्री भगवदुक्तिप्रमाणें नानासाहेबांचे प्रणिपात परिप्रश्न व सेवा असत आणि महाराज त्यांना उपदेश करीत. एकदां तर याच श्लोकाचें विवेचन महाराज सुमारें एक तास करीत होते. त्या विवेचनावरून नानासाहेबांची खात्री झाली कीं, महाजांनां संस्कृत उत्तम येत असलें पाहिजे. नानासाहेबांनीं महराजांची सेवा अति उत्तम केली. त्यांत विशेषत: दोन गोष्टीमुळें तर ते महाराजांच्या भक्तांना चिरस्मरणीय राहतील. एकतर महाराजांची जुनी मशीद होती ती मोडून फिरून बांधली व मोठी केली. नानासाहेबांना हें काम स्वत: करून घेण्याला सवड नव्हती. ह्मणून त्यांचे विनंतीवरून नानासाहेब निमोणकरांनीं येथें राहून स्वत: देखरेख करण्याचे पत्करलें व तें काम त्यांना

उत्तम तऱ्हेनें पार पाडले. मशीद बांधण्याला महाराजांची परवानगी म्हाळसापतीचेंद्वारें मागितली व ती महाराजांनीं दिली तरी पण काम चालू असतांना महाराजांनी वेळोवेळीं काम पाडून टाकावें आणि मोठे मोठे जड दगड व प्रयाली आपल्या हातांनीं दूर भिरकावून द्याव्यात. मग तें काम पुन: करण्यांत यावें. हें महाराजांचें कृत्य इतरानां चमत्कारिक वाटेल पण त्यांतील खरें इंगित ज्यांना ठाऊक आहे त्यांना महाराजांच्या कृतीचें नवल वाटणार नाहीं. शेवटीं एकदांचें मशिदीचें काम पुरें झालें. व त्या दिवशीं महाराज निनगांवास गेले असतां त्यांनां तेथून वाजत गाजत आणून नव्या मशिदींत बसविलें. या मशिदीचें काम करण्यांत येथील सुतार कोंडाजी, गबाजी व तुकाराम हे तिघे बंधू फारच उपयोगीं पडले. व मशीद बांधल्यानंतर मशिदीची व्यवस्था या तिघा बंधूकडे बरेच वर्षे होती. हा कोंडाजी पुढें वारला. व गबाजी व तुकाराम हल्लीं हयात आहेत. महाराजांचे देहावसानापर्यंत मशिद झाडणें महाराजांचीं भांडीं घासणें, महाराजांचे तोंड धुवावयाचें पाणी तापविणें व तें पाणी सारणे हीं सर्व कामें तुकारामच करीत असे. महाराज सहसा दुसऱ्या कोणाला हें काम करूं देत नसत. अजूनही रामनवमीचें निशाणाची मिरवणूक या सुताराचे घरा तयार होऊन तेथूनच निघते.

नानासाहेबांची दुसरा मोठी कामगिरी म्हणजे महाराजांचे कीर्तीचा प्रसार करून लोकांना महाराजांचे आशिर्वादाचा लाभ करून देणें हा होय. हे पूर्वी मामलतदार व नंतर डेप्युटी कलेक्टर असल्यामुळे यांनां पुष्कळ फिरावें लागे. व त्या फिरण्यामध्यें ते जेथें जेथें जात तेथें तेथें महाराजांचे गुणवर्णन करीत. व महाराजांच्या दर्शनाविषयीं लालसा उत्पन्न करीत. प्रस्तुत लेखकाला महाराजांचे दर्शनाचा लाभ घडावयाला कारण नानासाहेबच होत. मुंबई व ठाणे जिल्ह्यांतील हजारों लोक महाराजांचे दर्शन घेऊन आनंद व लाभ पावले. याला कारणही नानासाहेबच. मुंबईच्या मंडळीचें मन ओढण्याला नानासाहेबांशिवाय आणखीं दोन व्यक्ती विशेष कारणीभूत झाल्या. त्यांपैकीं एक रा. रा. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ दास गणू हे होत. हे पूर्वी पोलीस खात्यांत असत. यांनां तमाशाचा फार नाद असे. नानासाहेबांच्यामुळें हे महाराजांचे दर्शनास आले,

व हळू हळू त्यांच्या मनावर महाराजांनीं इतका परिणाम केला कीं, त्यांनीं नोकरी सोडून संत चरित्रांचा कीर्तनरूपानें व ग्रंथरूपानें लोकांत प्रसार करण्याचा उपक्रम सुरू केला. हा यांचा क्रम अजून सुरू आहे. यांनीं अर्वाचीन भक्तलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत हे संत चरित्रात्मक ग्रंथ लिहिले असून त्या शिवाय ईशावास्योपनिषद् आणि श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अमृतानुभव या दोन ग्रंथावर मराठी ओवीबद्ध टीका सरस आणि सुबोध केल्या आहेत. याशिवाय यांचे आणखीही ग्रंथ आहेत. नानासाहेब चांदोरकरांनीं यांनां मुंबईस नेऊन यांच्या भक्तिरस परिप्लुत कीर्तनांचा व तद्द्वारा महाराजांचे गुणश्रवणाचा लाभ मुंबईकरांस करून दिला. यांच्या कीर्तनामुळें मुंबईची व मुंबईच्या आसपासची पुष्कळ मंडळी महाराजांचे दर्शन घेण्यास आतुर झाली व दर्शनास गेली. वर उल्लेख केलेली दुसरी व्यक्ती म्हणजे प्रस्तुत लेखक याचेंही या सुमारास महाराजांचे चरणाजवळ पुष्कळ राहणें होऊं लागल्यामुळें मुंबईच्या सार्वजनिक चळवळींतून त्याचे अंग सहजिक निघालें व तो बावा म्हणजे (बैरागी, संन्यासी वगैरे) झाल्याचें पार्शी व इतर पत्रांतून छापून आल्यामुळें ज्यांच्या मुळें हें स्थित्यंतर झालें त्यांचे दर्शन घेण्यासाठीं कांहीं मंडळी आली. एकंदरींत १९१० पासून महाराजांचे दर्शनास येणाऱ्यांची संख्या बरीच वाढत गेली.

नानासाहेब चांदोरकर येथें आले त्या वेळीं येथें दर्शनास येणाऱ्या मंडळींनां रहाण्यासाठीं एकही वाडा नव्हता. पण ही उणीव महाराजांनीं लौकरच भरून काढली. ह्या जिल्ह्यांत रावबहादुर हरि विनायक साठे डेप्युटी कलेक्टर होते. त्यांचें प्रथम कुटुंब निवर्तल्याला पुष्कळ दिवस झाले होते. पण फिरून लग्न करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनां पुत्र संतति नसल्यामुळें त्यांच्या मित्रांचा त्यांनां फिरून लग्न करावें असा आग्रह चालला होता. शेवटीं महाराजांचे दर्शनास जाऊन महाराज आज्ञा करतील तसें करावयाचें असें ठरलें. त्या प्रमाणें ते दर्शनास आले. महाराजांनीं लग्न करण्याची आज्ञा दिली व मुलगा होईल असा आशिर्वाद दिला. रावबहादुरांनीं मुलगी पसंत करून ती महाराजांनां दाखवावी असें तिचे वडील रा. गणेश दामोदर केळकर यांनां कळविलें. त्याप्रमाणें ते

मुलीला तेथें घेऊन आल्यावेळीं महाराजांनीं तिच्या ओटींत एक खर्बुज टाकलें व मुलीला कुंकूं लावलें. पुढें योग्य वेळीं लग्न लागलें. आणि त्यानंतर लौकरच महाराजांचें सुचविण्यावरून त्यांनीं वर लिहिलेलें लिंबाचें झाड व त्या सभोंवतालची जागा विकत घेऊन तेथें एक वाडा बांधला. व त्यामुळें दर्शनास येणाऱ्या मंडळींची उतरण्याची सोय झाली. पुढें तीन वर्षांनीं महाराजांनीं प्रस्तुत लेखकाकडून एक वाडा बांधवून घेतला व त्यानंतर नागपूरचे श्रीमंत गोपाळराव उर्फ बापुसाहेब बुटी यांजकडून एक वाडा बांधवून घेतला. हा वाडा फार मोठा असून सर्वस्वी दगडाचा असून मजबूत आहे. व याला खर्चही बराच लागला. शिर्डीच्या आसपास किंबहुना संबंध तालुक्यांत अशी इमारत असेल असें वाटत नाहीं. याच वाड्यांत महाराजांची समाधी आहे.

रावबहादुर साठयांचा वाडा झाल्यानंतर लौकरच शिर्डीला संस्थानचें रूप येऊं लागलें. महाराजांची आरती होऊं लागली. आणि आरतीचे वेळेस चवऱ्या, छत्रचामरें महाराजांवर ढळूं लागली. चावडींत महाराज जातांना वाजतगाजत घोडा, पालखी, चोपदार, भजनकरी मंडळी, टके पताका या इतमामानिशीं जाऊं लागले. चावडी, आरसे, हंड्या, झुंबरें, तसबीरी यांनीं सुशोभित झाली. मशिदीला व चावडीला फरशी झाली. वगैरे वगैरे या सर्व शोभेचें श्रेय बहुतांशीं कै. सुंदराबाई क्षीरसागर उर्फ राधाकृष्णआई यांना आहे. या प्रेमळ भक्तीच्या आचार्या होत्या. असें म्हणण्याला यत्किंचितही हरकत नाहीं. यांच्याजवळ धन तर नव्हतेंच पण आपलें तन व मन सर्वस्वी महाराजांना अर्पण करून महाराजांचें निरनिराळे भक्तांकडून निरनिराळ्या जिनसा आणवून त्यांनीं शिर्डी संस्थान उत्तम थाटून दिलें. दुर्दैवानें त्यांचा अवतार लवकरच म्हणजे त्यांचे वयाचे ३५ वे वर्षी संपला. त्या येथें आठ नऊ वर्षेंच होत्या. पण तेवढ्या मुदतींत त्यांनीं जें जें केलें तें दुसऱ्याला पंचवीस वर्षांत करतां आलें असतें की नाहीं, याची शंका वाटते. या बाईमुळेंच चावडींत रात्रीं महाराजांची शेजारती व पहाटेस काकड आरती सुरू झाली. महाराज पहिल्यापहिल्यानें स्वतःची पूजासुद्धां करूं देत नसत. पहिली पूजा म्हाळसा

पतीकडून घेतली, नंतर कांहीं दिवसांनीं निंबगांवचे सितारामजी डेंगळे पूजा करावयास आले असतां महाराज त्यांच्यावर संतापले पण त्यांची पूजा शेवटास जाऊं दिली. नंतर कांहीं दिवसांनीं नाना साहेब चांदोरकरांचा धाकटा मुलगा महादेव उर्फ बापू याला समाधानानें पूजा करूं दिली. व त्यानंतर सगळ्यांनाच पूजा करण्याची मुभा झाली. पण त्या वेळेला महाराज आपली आरती करूं देत नसत. कांहीं दिवसांनीं प्रथम आरती करण्याचा मान रा. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर यांना मिळाला. हे पंढरपूरचे मुन्सफ असून अजारी पडल्यामुळें रजा घेऊन येथें आले होते, पण मनांत हेतु हाच कीं, आतां नोकरी सोडून उरलेले आयुष्याचे दिवस महाराजांचे चरणाजवळ घालवावयाचे व त्याप्रमाणें शेवटीं घडून आलें.

राधाकृष्णाआई स्वतः सर्व तऱ्हेची सेवा करीत. त्या रोज दोनदां महाजांचे जाण्याचे रस्ते झाडून साफ करीत. अर्थात तेथें असलेली सर्व घाण स्वतः काढीत. हा क्रम त्यांच्यापूर्वी बाळाजी पाटील नेवासकर यांनीं सुरूं केला होता. हे पूर्ण विरक्त भक्त सर्व संसार पसारा सोडून येथें येऊन राहिलें होते. त्यांना समजावून नेण्याकरितां पुष्कळ मंडळी आली पण हे गेलें नाहींत. हें नेहमी रस्ते झाडणें मशिद सारवणें वगैरे करीत. महाराजांचे दुरूनच दर्शन घेत. जवळ जात नसत. पाणी घ्यावयाचें तें महाराजांचें चरणतीर्थ किंवा स्नान होत असतांना महाराजांच्या अंगावरून पडलेलें पाणी किंवा महाराजांचें उष्टें पाणी हेंच घ्यावयाचें. तसेंच शेताचें उत्पन्न आलें कीं, सर्व महाराजांजवळ आणून द्यावयाचें व त्यांतून महाराज देतील तेवढें घ्यावयाचें अर्थात महाराज बहुतेक सगळेंच परत देत. दोन वर्षें येथें राहिल्यानंतर महाराजांनीं बाळाजी पाटलाला आपल्या घरीं जाण्याविषयीं आज्ञा केली व त्याप्रमाणें ते गेले. तरी पण वारंवार दर्शनाला येत आणि आपलें सगळें उत्पन्न महाराजांना अर्पण करीत. हे पुढें कांहीं वर्षांनीं वारले.

राधाकृष्णाआई स्वतः सर्व तऱ्हेची सेवा करीत इतकेंच नव्हे तर त्या महाराजांचे बहुतेक भक्तमंडळीकडून महाराजांची सेवा करवून

घेत. त्या निरनिराळीं कामें करीत. आणि त्यांत सगळ्यांना गोवीत आणि सगळी मंडळी प्रेमानें व हौसेनें काम करीत. त्यांत सर्व दर्जाची मंडळी असे व स्त्रियाही असत. माती दगड वाहणें, रस्ते झाडणे, चिखल करणें व वाहणें, खड्डे खोदणें व भरणें, झाडें लावणें, व लाकडें फोडणें, हंडया झुंबरें पुसणें, मशीद धुणे व रंगवणें कागदाची फुलें कातरणें, चवरी मोरचेल अबदागिरी निशाणें धरणें, निशाणें शिवणें वगैरे वगैरे सर्व तऱ्हेचीं कामें मोठमोठी मंडळी व मोठया घरण्यांतल्या कुलस्त्रियासुद्धां करीत असत. आणि आपल्याला सेवा करण्याला संधी मिळाली म्हणून आनंद मानीत.

महाराजांचा नित्यक्रम फार नियमानें पाळला जात असे. पाहटेस उठून धुनीपाशीं बसत, नंतर कांहीं वेळानें शौचविधि उरकून आपल्या हातानें फेडून टाकीत. नंतर कांहीं वेळ स्वस्थ बसत, तेवढया अवकाशांत भागोजी शिंदे या नांवाच्या गृहस्थानें येऊन महाराजांचें उजवें हाताला पट्टे असत तें सोडावयाचें: हात चोळावयाचें व सर्व आंग दाबावयाचें. नंतर चिलीम भरून आपण पेटवून महाराजांना ओढावयाला द्यावयाची व महाराजांनीं ओढून पुन्हां भागजीस ओढावयाला द्यावयाची. असें पांच सहा वेळां झाल्यावर भागोजींनीं जावयाचें. या भागोजीला महा-व्याधीनें पछाडीलें होतें, तरी महाराजांनीं कधींही त्याचा कंटाळा केला नाहीं. किंवा त्याच्या संबंधाचा आपला नित्यक्रम यत्किंचितही बदलला नाहीं. भागोजी गेल्यानंतर कांहीं वेळ महाराज बसत असत व त्यावेळेला कांहीं नियमित भक्तमंडळी येऊन सेवा करीत व नंतर महाराज तोंड धुण्यास उठत. महाराजांचें तोंड धुणें पाहण्यासारखें असे. हातावर पायावर, तोंडावर, कानावर पाणी येथेच्छ घ्यावयाचें व हे सर्व भाग चांगले स्वच्छ करावयाचे पण ते अत्यंत नाजूकपणानें करावयाचें.

श्री एकनाथ महाराजांनीं वर्णन केल्याप्रमाणें "रोम रगडतील संपूर्ण। या लागीं न करीं अंग मर्दन। एवं स्वदेहाचें देहपण। भूतहिंसे भेणें अहंता नाणी" (ए. भा., अ. ३ ओवी ४५८) असाच प्रकार स्नानाचे वेळेमही असे. तोंड धुणें झाल्यावर गांवांत भिक्षेला जात. भिक्षेसाठीं

नेमक्या पांच ठिकाणीं जाऊन एके ठिकाणीं उभे राहत. भाकरी व कोरड्यास काय येईल तें घ्यावयाचें व मग मशिदींत आल्यावर थोडेसें खावयाचें. खाणें झाल्यावर कांहीं वेळ बैठक व्हावयाची. त्या वेळीं बरीच भक्तमंडळी जमत असे, व महाराज गोष्टीरूपानें बोध करीत. कधीं कधीं याच बैठकीचे वेळीं केळीं, पेरु, आंबे विकत घेऊन मंडळींना महाराज वाटीत व आपल्या हातानें खाऊही घालीत.आपल्या हातानें खाऊ घालीत ह्मणजे केळीं आपल्या हातानें सोलून देत, पेरूचे आपल्या हातानें तुकडे करून देत व आंबे स्वतः चोळून देत. या बैठकीनंतर महाराज लेंडीवर जात. व तेथें साधारण एक तास राहत. लेंडीवरून परत आल्यावर तिसरे प्रहरचे दोन वाजेपर्यंत मशिदींतच असत. तितक्या वेळांत मंडळीकडून महाराजांची पूजा अर्चा, आरती होत असे. नंतर महाराजांचे जेवणानंतर महाराज पुन: लेंडीवर जात, तेथून सुमारें पाऊण तासानें परत येत व मग संध्याकाळपर्यंत पुनः मशिदींत असत. संध्याकाळीं थोडे बाहेर पडत व लगेच पुन: मशिदींत येऊन असत. सर्व साधारण बैठकी दिवसांतून तीन होत. एक सकाळीं न्याहरी नंतर दुसरी लेंडीवरून परत आल्यावर व तिसरी तिसरे प्रहरीं पांच वाजावयाचे सुमारास. तिन्ही बैठकींचे वेळीं गोष्टीरूपानें महाराज बोध करीत. महाराजांचें बोलण्यांत तेथें त्या वेळीं असलेल्या निरनिराळे मंडळीचे मनांत घोळत असलेल्या निरनिराळ्या बाबतींसंबंधानें खुलासे होऊन जात. महाराज गहन वेदांतविषयाचें प्रगट रीतीनें विवरण करीत नसत किंवा उपनिषदावर प्रवचन देत नसत. त्यांचा उपदेश मुख्यतः नैतिक असे. शिष्याची भूमि शुद्ध करून मग त्यांत ज्ञानाचें बीज पेरावयाचें ही सद्गुरुची शास्त्रोक्त वहिवाट आहे तसेंच महाराजही करीत,ह्मणून त्यांचा उपदेश सर्व साधारण नीतितत्वाचाच असे. पण या उघड शाब्दिक बोधापेक्षां असंख्य पटीनें मौल्यवान असा अनुभवरूपानें बोध महाराजांपासून मिळत असे व त्यामुळेंच महाराजांकडे श्रद्धेनें येणाऱ्या भक्तांचें अति उच्च प्रतीचें हित होत असे.

महाराजांकडे येणाऱ्यामध्यें सकाम भक्तांचेंच प्रमाण फार मोठें असे पण महाराज त्यांची कामना पुरवून त्यांचें मन आत्यंतिक हिताकडे वेमा-

सूक्ष्मपणानें वळवीत. महाराजांचा अवतार लोकांच्या उद्धारासाठींच होता व त्यांनीं सगळ्यांचें हितच केलें यांत तिळमात्र शंका नाहीं. त्यांच्या लीलांचें व गुणांचें यथार्थ वर्णन होणें अशक्य आहे.

**योवाऽनंतस्य गुणाननंताननु क्रमिष्यन् सतु बालबुद्धिः॥**
**रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित्कालेन नैवाखिलशक्तिधाम्नः ॥**

तरी पण महाराजांच्या लीलांचा शक्य तेवढा संग्रह झाल्यास तो सर्वांनां हितप्रद होईल, अशी माझी पूर्ण खात्री आहे. असा संग्रह माझे सन्मान्य मित्र रा. रा. गोविंद रघुनाथ उर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं केला असून त्यांपैकीं बराच भाग त्यांनीं ओवीमध्यें ग्रथित केला आहे. या ओवीबद्ध ग्रंथाची सुरवात महाराज देहधारी असतांना त्यांच्या प्रत्यक्ष अनुज्ञेनें झाली असून आजमितीला त्याचे पस्तीस अध्याय लिहून तयार आहेत. ग्रंथ फारच प्रेमळ व हृदयंगम झाला आहे व तो महाराजांचें भक्तांनांच नव्हे तर इतर वाचकांना सुद्धां हितकारक होईल यांत शंका नाहीं. यांतील ओव्या एकनाथ महाराजांच्या ओवीच्या धाटणीवर असून ग्रंथ वाचीत असतांना नाथमहाराजांच्या वाणीचें वारंवार स्मरण होतें. सारांश हा ग्रंथ श्रीसाईनाथ महाराजांच्या प्रसादाचें फळ आहे ही साक्ष पदोपदीं पटते.

शेवटीं या ग्रंथापासून महाराजांच्या भक्तांना व इतर भाविक वाचकांना आनंद व बोध प्राप्त होवो आणि त्या योगानें त्यांची महाराजांचे ठिकाणीं अधिकाधिक श्रद्धा वाढो अशी महाराजांची प्रार्थना करून हा उपोद्घात संपवितों.

बाबांचें एक लेंकरूं,
**हरि सीताराम दीक्षित.**



# श्री साईसच्चरित.

जैसें शारदीचिये चंद्रकळे ॥ माजी अमृतकण कोंवळें ॥
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥
तियां परि श्रोतां । अनुभवावी हे कथा ॥
अति हळुवार पण चित्ता । आणूनियां ॥

*    *    *

हें सलगी म्यां म्हणितलें । चरणा लागोनि विनविलें ॥
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनियां ॥
जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ॥
तरी अधिक तयाचा । संतोष आथी ॥
तैसा तुम्ही मी अंगिकारिला ॥ सज्जनीं आपुला म्हणीतला ॥
तरी उणें सहजें उपसाहाला । प्राथूं काई ॥

*    *    *

हें अनावर न विचारतां । वायां चिधिंवसा उपनला चित्ता ॥
येर्‍हवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ॥
कीं टिटिभु चांचुवरी । माप सूये सागरीं ॥

मी नेणतू त्यापरी । प्रवर्तें एथ ॥
आयका आकाश गिंवसावें । तरी आणिक त्याहुनी थोर होआवें॥
म्हणऊनि अपाडहें आघवें । निर्धारितां ॥

* * *

हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें ॥
गगन मुठीं सुवावें । मशकें कैंवीं ॥
परी एथ असे एक आधारु । तेणेंचि बोले मी सधरू ॥
जें सानुकूळ श्रीगुरू । ज्ञानदेव म्हणे ॥
येरव्हीं तरी मी मुर्खु । जरी जाहला अविवेकु ॥
तऱ्ही संतकृपा दीपकू । सोज्वळू असे ॥
लोहाचें कनक होय । हें सामर्थ्य परिसींच आहे ॥
कीं मृतही जीवितलाहे । अमृत सिद्धी ॥
जरी प्रगटे सिद्ध सरस्वती । तऱ्ही मुकया आथी भारती ॥
एथ वस्तु सामर्थ्यशक्ती । नवल कार्या ॥
का जयातें कामधेनू माये । तयासी अप्राप्य कांहीं आहे ॥
म्हणऊनि मी प्रवर्तों लाहे । ग्रंथीं इये ॥
तरी न्युनतें पुरतें । अधिक तें सरतें ॥
करोनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असें ॥
आतां देइजे अवधान । तुम्ही बोलविला मी बोलेन ॥
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारूयंत्र ॥

तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरुपितु ॥
ते आपला अलंकारितु । भलतयापरी ॥

ज्ञानेश्वरी अ० १

* * *

सेवंतिये रसिकांहीं । आंग पाहतां विशेषु नाहीं ॥
परि सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे ॥
तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मज देइजे ॥
जें नेणणें हेंचि सहजें । रूपकीं वाळा ।
तरी नेणतें जर्‍ही होयें । तर्‍ही देखोनि वापकीं माये ॥
हर्ष केंहीं न समाये । चोज करिती ॥
तैसें संत माहेर माझें । तुम्ही मिनलिया मी लाडें जें ॥
तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी
आतां विश्वात्मकु हा माझा । स्वामीश्रीनिवृत्तिराजा ॥
तो अवधारू वाक्य पूजा । ज्ञानदेवो म्हणे ॥

ज्ञानेश्वरी अ० १५



# अध्याय १ ला.

श्रीगणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः

श्री कुलदेवताय नमः ॥ श्री सीतारामचंद्राभ्यां नमः

श्री सद्गुरू साईनाथाय नमः ॥

प्रथम कार्यारंभ स्थिति । व्हावी निर्विघ्न परिसमाप्ति ॥
इष्टदेवतानुग्रह प्राप्ति । शिष्ट करिती मंगलें ॥ १ ॥
मंगलाचरणाचें कारण ॥ सर्व विघ्नांचें निवारण ॥
इष्टार्थ सिद्धि प्रयोजन । अभिवंदन सकलांचें ॥ २ ॥
प्रथम वंदूं गणपती । वक्रतुंड हेरंब मूर्ति ॥
चतुर्दश विद्यांचा अधिपति । मंगलाकृति गजमुख ॥ ३ ॥
पोटीं चतुर्दश भुवनें मातीं । म्हणोन गा तुज लंबोदर म्हणती ॥
परशु सतेज धरिसीं हस्तीं । विघ्नोच्छित्यर्थ भक्तांच्या ॥ ४ ॥
हे विघ्नविघातोपशमना । गणनाथा गजानना ॥
प्रसाद पूर्ण करीं मद्वचना । साष्टांग वंदन करितों मी ॥ ५ ॥
तूं भक्तांचा साह्यकारी । विघ्नें रूळती तुझ्या तोडरीं ॥
तूं सन्मुख पाहसी जरी । दरिद्र दूरी पळेल ॥ ६ ॥
तूं भवार्णवाची पोत । अज्ञान तमा ज्ञान ज्योत ॥
तूं तुझ्या ऋद्धिसिद्धिसहित । पाहे उल्हासित मजकडे ॥७ ॥

जयजयाजीं मूषकवहना । विघ्नकानन निकृंतना ॥
गिरिजानंदना मंगल वदना । अभिवंदन करितों मी ॥ ८ ॥

लाधो अविघ्न परिसमाप्ति । म्हणोन हेच शिष्टाचार युक्ति ॥
इष्टदेवता नमस्कृति । मंगल प्राप्त्यर्थ आदरिली ॥ ९ ॥

हा साईच गजानन गणपती । हा साईच घेऊनी परशू हातीं ॥
करोनि विघ्न विच्छित्ति । निज व्युत्पत्ति करू का ॥ १० ॥

हाचि भालचंद्र गजानन । हाचि एकदंत गजकर्ण ॥
हाचि विकट भग्न रदन । हा विघ्नकानन विच्छेदक ॥ ११ ॥

हे सर्व मंगल मांगल्या । लंबोदरा गणराया ॥
अभेदरूपा साई सदया । निजसुख निलया नेईगा ॥ १२ ॥

आतां नमूं ब्रह्मकुमारी । सरस्वती जे चातुर्य लहरी ॥
या मम जिव्हेसी हंसकरी । होई तिजवरी आरूढ ॥ १३ ॥

ब्रह्मवीणा जिचे करीं । निढळीं आरक्त कुंकुमचिरी ॥
हंसवाहनी शुभ्रवस्त्री । कृपा करीं मजवरी ॥ १४ ॥

ही वाग्देवता जगन्माता । नसतां इयेचि प्रसन्नता ॥
चढेल काय सारस्वत हाता । लिहवेल गाथा काय मज ॥ १५ ॥

जगज्जननी ही वेदमाता । विद्याविभव गुण सरिता ॥
साईसमर्थ चरितामृता । पाजो समस्तां मज करवीं ॥ १६ ॥

साईच भगवती सरस्वती । कारवीणा घेउनी हातीं ॥
निजचरित्र स्वयेंचि गाती । उद्धार स्थिति भक्तांच्या ॥ १७ ॥

उत्पत्तिस्थितिसंहारकर । रजसत्व तमगुणाकार ॥
ब्रह्माविष्णु आणि शंकर । नमस्कार तयांसी ॥ १८ ॥

हे साईनाथ स्वप्रकाश । आम्हां तुम्हींच गणाधीश ॥
सावित्रीश किंवा रमेश । अथवा उमेश तुम्हीच ॥ १९ ॥

तुम्हीच आम्हांतें सद्गुरू । तुम्हीच भवनदीचें तारूं ॥
आम्ही भक्त त्यांतील उतारू । पैल पारु दाविजे ॥ २० ॥

कांहींतरी असल्याशिवाय । पूर्व जन्मींचे सुकृतोपाय ॥
केवी जोडतील हे पाय । ऐसा टाय आम्हांतें ॥ २१ ॥

नमन माझें कुलदैवता । नारायणा आदिनाथा ॥
जो क्षीरसागरीं निवास कर्ता । दुःख हर्ता सकळांचा ॥ २२ ॥

परशुरामें समुद्र हटविला । तेणें जो नूतन भू भाग निर्मिला ॥
प्रांत कोंकण अभिधान जयाला । तेंथ प्रगटला नारायण ॥२३॥

जेणें जीवांसी नियामकपणें । अंतर्यामित्वें नारायणें ॥
कृपाकटाक्षे संरक्षणें । तयाच्या प्रेरणे आधीन मी ॥ २४ ॥

तैसेंच भार्गवें यज्ञसांगतेसीं । गौडदेशीय ज्या महामुनीसीं ॥
आणिलें त्या मुळपुरुषासीं । अत्यादरेसीं नमन हें ॥ २५ ॥

आतां नमूं ऋषिराज । गोत्रस्वामी भारद्वाज ॥
ऋग्वेद शाखाशाकल पूर्वज । आद्यगौड द्विज यांनी ॥ २६ ॥

पुढतीं वंदूं धरामर । ब्राह्मण परब्रह्मावतार ॥
मग याज्ञवल्क्यादि योगीश्वर । भृगु पराशर नारद ॥ २७ ॥

वेदव्यास पाराशर । सनक सनंदन सनत्कुमार ॥
शुक शौनक सूत्रकार । विश्वामित्र वसिष्ठ ॥ २८ ॥

वाल्मीक वामदेव जैमिनी । वैशंपायन आदिकरूनि ॥
नवयोगींद्रादिक मुनि । तयां चरणीं लोटांगण ॥ २९ ॥

आतां वंदूं संत सज्जनां । निवृति ज्ञानेश्वर मुक्ता सोपाना ॥
एकनाथा स्वामी जनार्दना । तुकया कान्हा नरहरि ॥ ३९ ॥
सकळांचा नामनिर्देश । करूं न पुरे ग्रंथावकाश ॥
म्हणोन प्रणाम करितों सर्वांस । आशीर्वचनास प्रार्थितों मी॥३१॥
आतां वंदूं सदाशिव । पितामह जो पुण्यप्रभाव ॥
बदरिकेद्वारीं दिला ठाव । संसार वाव मानुनी ॥ ३२ ॥
पुढें वंदूं निजपिता । सदा सदाशिव आराधिता ॥
कंठीं रुद्राक्षधारण करिता । आराध्यदैवत शिव जया ॥३३॥
पुढतीं वंदूं जन्मदाती । पोसिलें जिनें मजप्रति ॥
स्वयें कष्टोनी अहोरातीं । उपकार किती आठवूं ॥ ३४ ॥
बाळपणीं गेली त्यागुनी । कष्टें सांभाळी पितृव्यपत्नी ॥
ठेवितों भाळ तिचे चरणीं । हरिस्मरणीं निरत जी ॥ ३५ ॥
अवघ्यांहूनि ज्येष्ठ भ्राता । अनुपम जयाची सहोदरता ॥
मदर्थ जीवप्राण वेचिता । चरणीं माथा तयाचे ॥ ३६ ॥
अतां नमूं श्रोतेजन । प्रार्थितों आपुलें एकाग्र मन ॥
आपण असतां अनवधान । समाधान मज कैचें ॥ ३७ ॥
श्रोता जंवजंव गुणज्ञ चतुर । कथा श्रवणार्थी अति आतुर ॥
तंव तंव वक्ता उत्तरोत्तर । प्रसन्नांतर उल्हासें ॥ ३८ ॥
आपण जरी अनवधान । काय मग कथेचें प्रयोजन ॥
म्हणोन करितों साष्टांग वंदन । प्रसन्न मन परिसावें ॥ ३९ ॥
नाहीं मज व्युत्पत्ति ज्ञान ॥ नाहीं केलें ग्रंथपारायण ॥
नाहीं घडलें सत्कथा श्रवण । हें पूर्ण आपण जाणतां ॥४०॥

मीही जाणे माझे अवगुण। जाणें माझें मी हीनपण ॥
परी करावया गुरुवचन। ग्रंथ प्रयत्न हा माझा ॥ ४१ ॥

माझेंच मन मज सांगत। कीं मी तुम्हांपुढें तृणवत ॥
परी मज घ्यावें पदरांत। कृपावंत होऊनी ॥ ४२ ॥

आतां करूं सद्गुरु स्मरण। प्रेमें वंदूं तयाचे चरण ॥
जाऊं कायावाचा मनें शरण। बुद्धिस्फुरण दाता जो ॥४३॥

जेवणार बैसतां जेवावयास। अंतीं ठेवितो गोड घांस ॥
तैसाच गरुवंदन सुग्रास। घेऊन नमनास संपवूं ॥ ४४ ॥

ॐनमो सद्गुरुराया। चराचराच्या विसाविया ॥
अधिष्ठान विश्वा अवघिया। अससी सदया तूं एक ॥ ४५ ॥

पृथ्वी सप्तद्वीप नवखंड। सप्तस्वर्ग पाताळ अखंड ॥
यांतें प्रसवी जें हिरण्य गर्भांड। तेंच ब्रह्मांड प्रसिद्ध ॥ ४६ ॥

प्रसवे जी ब्रह्मांडा यया। जी नामें अव्यक्त वा माया ॥
तया मायेचियाही पैल ठाया। सद्गुरुरायानिज वसती ॥४७॥

तयाचें वानावया महिमान। वेदशास्त्रीं धरिलें मौन ॥
युक्तिजुक्तीचें प्रमाण। तेथें जाण चालेना ॥ ४८ ॥

ज्या ज्या दुज्या तुज उपमावें। तो तो आहेसी तूंच स्वभावें ॥
जें जें कांहीं दृष्टी पडावें। तें तें नटावे त्वां स्वयें ॥ ४९ ॥

ऐसिया श्री साईनाथा। करुणार्णवा सद्गुरु समर्था ॥
स्वसंवेद्या सर्वातीता। अनाद्यनंता तुज नमो ॥ ५० ॥

प्रणाम तूतें सर्वोत्तमा। नित्यानंदा पूर्ण कामा ॥
स्वप्रकाशा मंगलधामा। आत्मारामा गुरुवर्या ॥ ५१ ॥

करूं जातां तुझें स्तवन। वेदश्रुतीही धरीती मौन ॥
तेथें माझें कोण ज्ञान। तुज आकलन कराया ॥ ५२ ॥

जयजय सद्गुरु करुणागारा। जयजय गोदातीर विहारा ॥
जयजय ब्रह्मेश रमावरा। दत्तावतारा तुज नमों ॥ ५३ ॥

ब्रह्मासीं जें ब्रह्मपण। तें नाहीं सद्गुरुवीण ॥
कुरवंडावे पंचप्राण। अनन्य शरण रिघावें ॥ ५४ ॥

करावें मस्तकें अभिवंदन। तैसेंच हस्तांहीं चरणसंवाहन ॥
नयनीं पाहत असावें वदन। घ्राणें अवघ्राणन तीर्थाचें ॥५५॥

श्रवणें साईगुणश्रवण। मनें साई मूर्तीचें ध्यान ॥
चित्तें अखंड साईचिंतन। संसारबंधन तुटेल ॥ ५६ ॥

तन मन धन सर्व भावें। सद्गुरुपायीं समर्पावें ॥
अखंड आयुष्य वेचावें। गुरुसेवेलागुनी ॥ ५७ ॥

गुरुनाम आणि गुरुसहवास। गुरुकृपा आणि गुरुचरण पायस ॥
गुरुमंत्र आणि गुरुगृहवास। महत्प्रयास प्राप्ती हीं ॥ ५८ ॥

प्रचंड शक्ति यया पोटीं। अनन्य भक्तीं घेतली कसवटी ॥
भक्तांस मोक्षद्वारवंटीं। नेतील लोटीत नकळतां ॥ ५९ ॥

गुरुसंगति गंगाजळ। क्षाळिते मळ करिते निर्मळ ॥
मनासम दुजें काय चंचळ। करिते निश्चळ हरिचरणीं ॥ ६० ॥

आमुचें वेदशास्त्र पुराण। श्री सद्गुरु चरण सेवन ॥
आम्हां योग याग तपसाधन। लोटांगण गुरु पायीं ॥ ६० ॥

श्री सद्गुरुनाम पवित्र। हेंच आमुचें वेदशास्त्र ॥
साईसमर्थ आमुचा मंत्र। यंत्रतंत्रही तें एक ॥ ६२ ॥

ब्रम्हसत्य हे निजप्रतीति । जगन्मिथ्या हे नित्य जागृति ॥
ऐसी ही परमप्राप्तीची स्थिति । साई अर्पिती निजभक्तां ॥६३॥
परमात्मसुख परमात्म प्राप्ति । ब्रम्हानंद स्वरूप स्थिति ॥
इत्यादिही शब्द जळाची गुंती । आनंद वृत्ति पाहिजे ॥ ६४ ॥
जयास वाणली ही एकवृत्ति । सदासर्वदा ही एक स्थिती ॥
सुखशांति समाधान चित्तीं । परमप्राप्ति ती हीच ॥ ६५ ॥
साई आनंद वृत्तीची खाण । असलिया भक्त भाग्याचा जाण।
परमानंदाची नाहीं वाण । सदैव परिपूर्ण सागरसा ॥ ६६ ।
शिवशक्ति पुरुषप्रकृती । प्राणगती दीपदीप्ति ॥
ही शुद्धब्रम्हचैतन्य विकृती । एकीं कल्पिती द्वैतता ॥ ६७ ॥
'एकाकी न रमते' ही श्रुती। 'बहुस्याम्' ऐशिया प्रीती ॥
आवडूं लागे दुजियाची संगती। पुनरपि मिळती एकत्वीं ॥६८॥
शुद्धब्रह्मरूप जे स्थिती । तेथें ना पुरुष ना प्रकृती ॥
दिनमणीची जेथें वस्ती। दिवस वाराती कैंची ते ॥ ६९ ॥
गुणातीत मूळ निर्गुण । भक्तकल्याणालागी सगुण ॥
तो हा साई विमल गुण । अनन्य शरण तयासीं ॥ ७० ॥
शरण रिघाले साई समर्था । त्यांहीं चुकविलें बहुतां अनर्था ॥
ह्मणवूनि या मी निजस्वार्था । पायीं माथा टेवितों ॥ ७१ ॥
तत्वदृष्ट्या जो तुळे निराळा। भक्तिसुखार्थ राही जो वेगळा ॥
करी देवा भक्तांच्या लीला। तया प्रेमळा प्रणिपात ॥ ७२ ॥
जो सर्व जीवाची चित्कला। संवित्स्फुरणें जो अधिष्ठिला ॥
जो जड चैतन्य आकारला। तया प्रेमळा प्रणिपात ॥ ७३ ॥

तूं तव माझी परम गति । तूंच माझी विश्रांति ॥
पुरविता मज अर्ताचि आर्ती । सुख मूर्ति गुरुराया ॥ ७४ ॥

आतां या नमनाची अखेरी । भूतीं भगवंत मत्यंतरी ॥
जीव मात्रास मी वंदन करीं । घ्या मज पदरीं आपुल्या ॥७५॥

नमन सकळ भूतजाता । येणें सुखावो विश्वभर्ता ॥
तो विश्वंभर अंतर्बाह्यता । एकात्मता अभेदें ॥ ७६ ॥

एवं परिपूर्ण झालें नमन । जें आरब्ध परिसमाप्तीचें साधन ॥
हेंच या ग्रंथाचें मंगलाचरण । आतां प्रयोजन निवेदीं ॥ ७७ ॥

साईनीं मज कृपा करून । अनुग्रहिलें जैं पासून ॥
तयांचेच मज अहर्निश चिंतन । भव भयकृंतन तेणेंनी ॥७८॥

नाहीं मज दुसरा जप । नाहीं मज दुसरें तप ॥
अवलोकीं एक सगुणरूप । शुद्धस्वरूप साईचें ॥ ७९ ॥

पाहतां श्रीसाईचें मुख । हरून जातसे तहान भूक ॥
काय तयापुढें इतर सुख । पडे भवदुःख विस्मृति ॥ ८० ॥

पाहतां त्यावांचे नयनाकडे । आप आपणा विसर पडे ।
आंतुनी येती जैं प्रेमाचे उभडे । वृत्ति बुडे रस रंगीं ॥ ८१ ॥

कर्मधर्म शास्त्रपुराण । योगयाग अनुष्ठान ॥
तीर्थ यात्रा तपाचरण । मज एक चरण साईचे ॥ ८२ ॥

अखंड गुरुवाक्यानुवृत्ति । दृढ धरितां चित्तवृत्ति ॥
श्रद्धेचिया अढळ स्थिति । स्थैर्य प्राप्ति निश्चळ ॥ ८३ ॥

हेच कर्मानुबंध स्थिति । वाढली साई पदासक्ति ॥
प्रत्यया आली अतर्क्य शक्ति । काय म्या किती वर्णावी ॥८४॥

शिर्डी येथील

# श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भिष्म यांनीं शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारीं पद्यें व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भिष्म यांनी तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,

५ टर्नर रोड वांद्रे

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर.

# श्री साईनाथ भजनमाला.

सुधारून वाढविलेली आवृत्ती.

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी कारण प्रती फारच थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,
रंगाऱ्याची चाळ
बांद्रा
बी. बी. सी. आय. रेल्वे.

हें पुस्तक श्री लक्ष्मी-नारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून
रा. आ. तर्खंड यांनीं ५ टर्नर रोड बांद्रे येथें
प्रसिद्ध केलें.